सकाळ

# करिअर घडविताना



के. रवींद्र

# आयएमयू सेट परीक्षा

भारतात १२ प्रमुख बंदरे आणि अन्य २०० बंदरे आहेत. ही बंदरे भारताच्या ९५ टक्के आंतरराष्ट्रीय व्यापार हाताळतात आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. मर्कंटाइल मरीनची जहाजे सागरी व्यापारातील एक आवश्यक घटक आहे. जगातील सुमारे ७ टक्के व्यापारी नाविक भारतीय आहेत. भारतीय व्यापारी जहाजांचे संरक्षण, तसेच हिंद महासागर क्षेत्रातील शिपिंग मार्गांची सुरक्षा सुनिश्चित करण्याची जबाबदारी भारतीय नौदलावर आहे.

इंडियन मेरीटाइम युनिव्हर्सिटीमार्फत विविध कोर्सेससाठी प्रवेश दिला जातो त्याकरिता 'आयएमयू सेट' (इंडियन मेरीटाईम युनिव्हर्सिटी कॉमन एंट्रन्स टेस्ट) उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

## अभ्यासक्रम

### इंजिनिअरिंग (अभियांत्रिकी)

बी.टेक मरिन इंजिनिअरिंग, बी. टेक नौदल आर्किटेक्चर आणि मरिन इंजिनिअरिंग, एम.टेक मरिन इंजिनिअरिंग आणि मॅनेजमेंट, एम. टेक नौदल आर्किटेक्चर आणि मरिन इंजिनिअरिंग, एम.टेक ड्रेजिंग आणि हार्बर इंजिनिअरिंग, पीजी डिप्लोमा इन मरिन इंजिनिअरिंग

**कालावधी** : पदवी ४ वर्षे व पदव्युत्तर २ वर्षे

पदवी शैक्षणिक अर्हता व पात्रता : १०+२ किंवा समतूल्य (पीसीएम-६० टक्के सरासरी आणि दहावी किंवा बारावी परीक्षेत इंग्रजी विषयात किमान ५० टक्के गुण)

केवळ अविवाहित उमेदवार यासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.

**कमाल वयोमर्यादा (पुरुष)** : (a) सर्वसाधारण २५ वर्षे, (b) OBC (NCL) : २८ वर्षे (c) SC/ST : ३० वर्षे

**कमाल वयोमर्यादा (महिला)** : (a) सर्वसाधारण : २७ वर्षे (b) OBC (NCL) : ३० वर्षे (c) SC/ST : ३२ वर्षे

**पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता व पात्रता** : मेकॅनिकल/सिव्हिल/मरिन/नेव्हल आर्किटेक्चरमधील अभियांत्रिकी पदवीधर किंवा एकूण ६० टक्के गुणांसह समतूल्य.

- कमाल वयोमर्यादा नाही.

### सायन्स

**बी.एस्सी. नॉटिकल सायन्स, बी.एस्सी. जहाज बांधणी आणि दुरुस्ती, डिप्लोमा इन नॉटिकल सायन्स (DNS)**

**कालावधी** : ३ वर्षे आणि शैक्षणिक अर्हता व पात्रता अभियांत्रिकीप्रमाणे राहील.

### मॅनेजमेंट

बीबीए मेरीटाइम लॉजिस्टिक्स (अॅप्रेंटिसशिप एम्बेडेड), बीबीए लॉजिस्टिक, रिटेलिंग आणि ई-कॉमर्स, एमबीए पोर्ट आणि शिपिंग मॅनेजमेंट, एमबीए आंतरराष्ट्रीय वाहतूक आणि लॉजिस्टिक मॅनेजमेंट

**कालावधी** : पदवी ३ वर्षे व पदव्युत्तर २ वर्षे

**शैक्षणिक अर्हता व पात्रता** : १०+२ किंवा समतूल्य (कोणत्याही शाखेतून किमान ६० टक्के एकूण गुण आणि दहावी आणि/किंवा बारावी परीक्षेत इंग्रजी विषयात किमान ५० टक्के गुण.)

- वयोमर्यादा वरीलप्रमाणे

### संशोधन कार्यक्रम

**पीएच.डी. प्रोग्रॅम, एम.एस. (संशोधनाद्वारे)**

**शैक्षणिक अर्हता व पात्रता** : १०+२+UG पदवी (३ किंवा अधिक वर्षे) किंवा ११+१+ UG पदवी (३ किंवा अधिक वर्षे)

IMUCET २०२३ची अर्जप्रकिया अंदाजे मार्च २०२३च्या चौथ्या आठवड्यापासून सुरू होईल.

**(लेखक विद्यार्थिमित्र या वेबसाइटचे संस्थापक आहेत.)**

### परीक्षेचा पॅटर्न...

- परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतली जाईल.
- वस्तुनिष्ठ (MCQ) प्रकारचे प्रश्न विचारले जातात.
- पदवी परीक्षा १२० गुणांची असेल, तर पदव्युत्तर परीक्षा २०० गुणांची असेल. पदव्युत्तर प्रत्येक योग्य उत्तरासाठी उमेदवारांना १ गुण दिले जातील आणि कोणतेही नकारात्मक गुणांकन नाही.
- परीक्षा बी. टेक. आणि एम.टेक. प्रोग्रॅमसाठी इच्छुक उमेदवारांची भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, सामान्य ज्ञान आणि योग्यता या विषयातील चाचणी.
- एमबीए प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांची परिमाणवाचक, शाब्दिक, डेटा इंटरप्रिटेशन आणि तार्किक तर्क क्षमता यामधील प्रवीणतेसाठी चाचणी केली जाते.
- परीक्षेचा कालावधी : ३ तास
- महत्त्वाची लिंक : https://www.imu.edu.in

Kolhapur, Main
08/03/2023 Page No. 10